दरडप्रवण क्षेत्रात सुरक्षा जाळ्या बसवा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : मुंबईत दरडप्रवण भागात राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा जाळ्या बसविण्याचे काम तातडीने पूर्ण करावे. अतिधोकादायक ठिकाणालगत झोपु प्राधिकरण (एसआरए), म्हाडा यांचे प्रकल्प सुरू आहेत, अशा प्रकल्पांमध्ये अतिधोकादायक ठिकाणच्या रहिवाशांना सामावून घेण्याबाबत धोरण तयार करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी येथे दिले.

कुर्ला विधानसभा क्षेत्रातील विविध समस्यांबाबत आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी शिंदे यांनी हे निर्देश दिले. आमदार मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, उपमुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर, म्हाडाचे मिलिंद बोरीकर आदी यावेळी उपस्थित होते.

चुनाभट्टी येथे डोंगराळ भागात वारंवार दरड कोसळण्याच्या घटना घडतात. त्यामुळे तेथील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत आमदार कुडाळकर यांनी मागणी केली होती.

इमारतींच्या डागडुजीचे आदेश

- कुर्ला येथील प्रीमियर कंपनीच्या जागेवर उभारलेल्या मिठी नदीशेजारील नागरिकांचे पुनर्वसन केलेल्या इमारतींची डागडुजी तातडीने करण्यात यावी.या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना पाणी स्वच्छता आणि कचरा उचलणे, अशा मूलभूत सुविधा पुरवण्याचे निर्देश शिंदे यांनी यासंदर्भात झालेल्या बैठकीत दिले.
- मिठी नदीशेजारील आणि विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील, क्रांतीनगर, संदेशनगर, जरीमरी येथील बाधीत झोपडीधारकांना कुर्ला येथील एचडीआयएल संकुल, प्रिमिअर वसाहत येथील चार इमारतीमध्ये पुनर्वसन करण्यात आले होते. माहुल येथील सोळाशे नागरिकांचे पुनर्वसन याच इमारतीमध्ये करण्यात आले आहे. मात्र या इमारतीमध्ये छतगळती, उद्वाहक याबाबत अनेक प्रश्न आहेत. या इमारतीमध्ये पाणीपुरवठा स्वच्छता आणि सांडपाणी निचऱ्याचे गंभीर प्रश्न सतावत असल्याचे रहिवाशांनी सांगितले.

घाट रस्ते अधिक सुरक्षित

उपाययोजना राबवणार, शिवेंद्रसिंहराजे यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

सातारा : घाटरस्त्यांचे महत्त्व केवळ भौगोलिक दृष्टीनेच नव्हे, तर आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही अत्यंत मोलाचे आहे. महाराष्ट्रातील घाटमार्ग हे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र तसेच कर्नाटक व गोवा या राज्यांच्या दळणवळणाचे महत्त्वाचे दुवे आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घाटमार्गांची कामे करण्यात येत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत, अशी माहिती राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.

शिवेंद्रसिंहराजे म्हणाले, की राज्य शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत घाटरस्त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी सुस्पष्ट धोरण आखले आहे. रस्ते वाहतुकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत. दरडी कोसळण्याच्या घटना घडणाऱ्या घाटात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जाळी (बोल्डर नेट), रोप बेस स्टॅबिलायझेशन आणि मजबुतीकरणाची कामे करण्यात येत आहेत. जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक घाटरस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्या पार्श्वभूमीवर घाटांत दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात आला आहे. या घाटरस्त्यांची कामे प्राधान्याने करण्यात येत आहेत.

वळणांच्या ठिकाणी सौरऊर्जेवरील दिवे

घाटमाथ्यावर वळणांच्या ठिकाणी सौरऊर्जेवर चालणाऱ्या चेतावणी दिव्यांची योजना आखण्यात येत आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण निश्चितच कमी होईल. दुर्गम घाटमार्गांवर तातडीची मदत मिळण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ, मदत पथक (रेस्क्यू टीम,) स्वयंसेवी संस्था आणि वाहतूक पोलिसांशी संपर्क साधून त्वरित प्रतिसाद देणारी यंत्रणा कार्यान्वित केली जात आहे. काही घाटमार्ग हे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे असल्यामुळे या यंत्रणेशी सतत संपर्क ठेवून समस्या सोडवण्यात येत आहेत.

एसटीच्या ताफ्यात ‘स्मार्ट बस’

दरवर्षी ‘एआय’वरील पाच हजार बस, मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : ‘महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात दरवर्षी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानावर आधारित पाच हजार ‘स्मार्ट बस’ घेण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यातील बस खरेदीची निविदा प्रक्रिया पुढील महिन्यात राबविण्यात येणार असून, त्यामध्ये एक हजार बस इलेक्ट्रीक असतील.’ असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

‘गेल्या चार ते पाच वर्षांत एसटी महामंडळात नवीन बस घेतल्या गेलेल्या नाहीत. आयुर्मान संपलेल्या अनेक जुन्या बस आहेत. त्यामुळे दरवर्षी पाच हजार ‘स्मार्ट बस’ घेण्याबाबतची संकल्पना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मान्य केली आहे. त्यानुसार जुलै महिन्यात पाच हजार ‘स्मार्ट बस’ची निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या बस ‘एआय’ तंत्रज्ञानावर आधारित असतील.’ असे सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

२० जून रोजी श्वेतपत्रिका

एसटी महामंडळाला सुमारे सात हजार कोटींचा तोटा झाला आहे. कोणत्या काळात किती तोटा झाला, किती खर्च झाला याची माहिती नागरिकांना उपलब्ध व्हावी, यासाठी २० जूनला श्वेतपत्रिका काढली जाणार आहे, अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

सर्वाधिक खासगी बालवाड्या पुण्यात

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यभरात आतापर्यंत ९ हजार २७७ खासगी बालवाड्या, पूर्वप्राथमिक वर्गांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली असून, त्यात सर्वाधिक १,४१० बालवाड्या, पूर्वप्राथमिक वर्ग पुणे जिल्ह्यातील आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार आता पूर्वप्राथमिक शिक्षणाचा समावेश पायाभूत स्तर म्हणून औपचारिक शालेय शिक्षणात करण्यात आला आहे. राज्यातील शासकीय अंगणवाड्यांसह खासगी बालवाड्या, पूर्वप्राथमिक वर्गांमध्येही राष्ट्रीय शिक्षण धोरण राबवण्यात येणार आहे. त्यानुसार तीन ते सहा वर्षे वयोगटातील मुलांसाठी बालवाटिका, बालवाटिका १, बालवाटिका २ या अभ्यासक्रमाची निर्मितीही करण्यात आली आहे. मात्र, राज्यातील खासगी बालवाड्या, पूर्वप्राथमिक वर्गांची माहिती राज्य सरकारकडे उपलब्ध नसल्याने खासगी बालवाड्यांना नोंदणी बंधनकारक करण्यात आली. नोंदणीमध्ये सर्वसाधारण माहिती, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिसंख्या याची माहिती देणे आवश्यक आहे.

‘मुंबई-गोवा महामार्गावर पर्यायी मार्गांचे रुंदीकरण’

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर आणि माणगाव बायपास रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत प्रवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका होणे आवश्यक आहे. त्यासाठी मोरबा रोड ते मुंबई-गोवा हायवे रस्ता, साईनगर कालवा ब्रिज ते उत्तेखोल कालवा गावापर्यंतचा रस्ता आणि निजामपूर रोड कालवा ते भादाव रस्ता हे माणगाव नगरपंचायत हद्दीतील तीन रस्ते आणि इंदापूर कॅनल रस्ता ते विगवली फाटा रस्ता, अशा चारही रस्त्यांच्या कामांसाठी आवश्यक १५ कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात येईल. ही कामे पूर्णत्वास नेण्याची कार्यवाही तातडीने करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी येथे दिले.

इंदापूर व माणगाव बायपास रस्त्यांच्या कामासंदर्भात पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन केले होते. त्यास सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर आदी उपस्थित होते. ज्या कामांसाठी राष्ट्रीय महामार्गतर्फे निधी उपलब्ध होऊ शकत नाही, त्यासाठी राज्य शासन निधी उपलब्ध करून देईल, असे पवार यांनी नमूद केले. या महामार्गावर वाहतुकीची कोंडी निर्माण होऊ नये, यासाठी अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यासंदर्भात रायगडचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना पवार यांनी सूचना दिल्या. पर्यटन क्षेत्र विकासासाठी केंद्राला प्रस्ताव पाठवण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

विद्यार्थी आत्महत्या; मुख्याध्यापिकेवर गुन्हा दाखल

पनवेल : तालुक्यातील पोयंजे गावातील ‘नर्सिंग’ महाविद्यालयात परिचारकाचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या वसतिगृहात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ३ जूनला घडली होती. मृत विद्यार्थ्याच्या आईने दिलेल्या तक्रारीनंतर पनवेल तालुका पोलिसांनी संबंधित महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिकेविरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा तसेच आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे. पोयंजे गावातील ‘नर्सिंग’ महाविद्यालयात विद्यार्थ्याचा सहा महिन्यांपासून महाविद्यालयात अपमान केला जात होता. त्याने याबाबतची माहिती आईला फोनवरून दिली होती.

वादळी वाऱ्याने कमान कोसळून दोघींचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर : शहरात सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यात महापालिकेच्या सिद्धार्थ उद्यानाच्या कमानीचा सिमेंटचा भाग कोसळून दोन महिलांचा मृत्यू झाला असून, अन्य तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले.

चाळीसगाव तालुक्यातील धामणगाव येथील स्वाती अमोल खैरनार (३७) व शहरातील टी.व्ही. सेंटर भागातील रेखा हरिभाऊ गायकवाड अशी मृत व्यक्तींची नावे आहेत. अन्य तीन जण जखमी असून, त्यातील एकजण उद्यानासमोरील फुगे विक्रेता होता, असे सांगण्यात आले. महापालिकेच्या सिद्धार्थ उद्यानाच्या कमानीचा सिमेंटचा भाग वादळी वाऱ्यात पडला. बीओटी प्रकल्पातून विकासकाने ही कमान बांधून दिली होती, असे सांगण्यात येत आहे. अचानक आलेल्या वाऱ्यामुळे या कमानी भोवती बांधलेल्या फलकासह सिमेंटच्या व खडीचा भाग अचानक डोक्यात कोसळला. यात दोन जणींचा मृत्यू झाला. तर फुगे विक्रेता शेख अकील शेख रहीम हा गंभीर जखमी झाला.

सावंतवाडी-पंढरपूर विशेष रेल्वेगाडीची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी सावंतवाडी-पंढरपूर मार्गावर विशेष रेल्वेगाडी सोडावी, अशी मागणी अखंड कोकण रेल्वे प्रवासी सेवा समितीने केली आहे.

आषाढी एकादशीनिमित्त विठोबाचे दर्शन घेण्यासाठी वारकरी पंढरपूरला जातात. मध्य रेल्वेतर्फे नागपूर, अमरावती, कोल्हापूर, भुसावळ, लातूर, मिरज आदी ठिकाणांहून पंढपूरला जाण्यासाठी विशेष रेल्वेगाड्यांची घोषणा करण्यात येते. कोकणातूनही मोठ्या संख्येने वारकरी आषाढी पंढरपूरला जातात. परंतु, रेल्वेने सावंतवाडीतून पंढरपूरला जाणारी रेल्वेगाडी सोडलेली नाही. कोकणातून पंढरपूर रस्तेमार्गाने जवळ असले, तरी घाटमार्गावरील प्रवासामुळे वेळ अधिक लागतो व प्रवास त्रासदायक होतो. रेल्वेमार्गाने गेल्यास प्रवाशांचा प्रवास आरामदायक होईल. त्यामुळे १ ते १० जुलैदरम्यान सावंतवाडी - पंढरपूर रेल्वे मार्गावर विशेष रेल्वेगाड्या सोडाव्यात, अशी मागणी अखंड कोकण रेल्वे प्रवासी सेवा समितीने केली आहे.

रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लि.

RELIGARE HOME LOANS

नोंदणीकृत कार्यालय येथे: १४०७, १४ वा मजला, चिरंजीव टॉवर, ४३, नेहरू प्लेस, नवी दिल्ली-११००१९
कॉर्पोरेट ऑफिस: ८वा मजला, मॅक्स हाऊस, ब्लॉक ए, डॉ. झा मार्ग, ओखला फेज ३, ओखला इंडस्ट्रियल इस्टेट, नवी दिल्ली- ११००२०
सीआयएन क्र.: यू७४८९९डीएल१९९३पीएलसी०५४२५९ आणि Website: www.religarehomeloans.com

सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ ("सरफेसी कायदा, २००२") च्या कलम १३(२) अंतर्गत सूचना

आम्ही, रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लि., आमच्या अधिकृत अधिकाऱ्यामार्फत, सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत एक मागणी सूचना जारी केली आहे. त्यातील मजकूर म्हणजे तुम्ही मुद्दल, व्याज इत्यादी हप्त्यांच्या देयकात केलेला कसूर, थकलेली रक्कम खाली नमूद केल्याप्रमाणे आहे.

कर्जदाराचे/ सह-कर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक/ कर्जाची रक्कम	१३(२) सूचनेची तारीख / एनपीए तारीख	कलम १३(२) कायद्याच्या सूचनेनुसार मागणी रक्कम	पत्रव्यवहाराचा पत्ता
१. दिवंगत श्री. ए. पी. मोहम्मद (कायदेशीर वारसांद्वारे) २. श्रीमती बुस्नरा पोन्मबोथ मोहम्मद, दिवंगत श्री. ए. पी. मोहम्मद यांच्या पत्नी (कायदेशीर वारसांद्वारे) कर्ज खाते क्र.: एक्सएमएचडीएनएसके००११५५४९ कर्जाची रक्कम: रु.५,००,०००.००/-	30.05.2025 / 09.10.2023	रु.२,५८,९५९.७६/- (रुपये दोन लाख अठ्ठावन्न हजार नऊशे एकोणसाठ आणि शहात्तर पैसे फक्त) दि. ३१.१०.२०२३ रोजीनुसार	पत्ता १: येथे राहणारः गट क्र. २६५, घर क्र. ५०६, प्लॉट क्र. ३, वाडीवऱ्हे, लॅण्डमार्क वाडीवऱ्हे, नाशिक, (एमएच.) ४२२४०१, पत्ता २: मेनार टॉयज वाडीवऱ्हे, नाशिक, ता. इगतपुरी आणि जिल्हा नाशिक, (एमएच.)- ४२२४०३. पत्ता ३: टॉवर ए, विंग एर मधील फ्लॅट क्र. २०३ मोजमापे ५३.२३२ चौ. मीटर. प्लॉट क्र. १ वर बांधल्या जाणाऱ्या "आनंदवन" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेत दुसऱ्या मजल्यावर बिल्टअप, मोजमापे ८९८१.०० चौ. मीटर, गट क्र. ६०७/२ + ६२९ पीपी यापैकी, गावातील गोंडे दुमाले, तहसील, इगतपुरी आणि जिल्हा नाशिक, (एम.ओ.)- ४२२२०८ येथे स्थित.

गहाण मालमत्ता: टॉवर ए मध्ये फ्लॅट क्र. २०३ असलेली मालमत्ता, विंग एर, "आनंदवन" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेत दुसऱ्या मजल्यावर बांधलेले मोजमापे ५३.२३२ चौ. मीटर, प्लॉट क्रमांक १ यावर बांधले जाणारे मोजमापे ८९८१.०० चौ. मीटर, गट क्र. ६०७/२ + ६२९ पी बाहेर, गोंडे दुमाले, तहसील इगतपुरी आणि जिल्हा नाशिक, महाराष्ट्र येथील स्थितचे ते सर्व भाग आणि पार्सल.

शिवाय, कारणांसह, आम्हाला वाटते की, तुम्ही मागणी सूचनेच्या सेवेला टाळाटाळ करत आहात. त्यामुळे, सदर ही मागणी नोटीस प्रसिद्ध केली आहे. तुम्हाला याद्वारे रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांना या मागणीच्या सूचना प्रकाशित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत वरील रक्कम, पुढील व्याज, खर्च, आनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादीसह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अन्यथा, रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, कर्जदाराच्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यासह, सदर निर्देशित कायद्याच्या कलम १३(४) च्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींनुसार सर्व किंवा कोणत्याही एक किंवा अधिक सुरक्षित मालमत्तेवर आवश्यक कारवाई करेल. शिवाय, सदर कायद्याच्या कलम १३(१३) अंतर्गत तुम्हाला विक्री/ भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे वरील सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास मनाई आहे. कृपया लक्षात ठेवा की, पुढील कोणतीही मागणी सूचना जारी केली जाणार नाही.

ठिकाण: नाशिक, महाराष्ट्र, **दिनांक:** १२.०६.२०२५ — अधिकृत अधिकारी, मेसर्स रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड

दि जळगाव पीपल्स को-ऑप.बँक लि.

(मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक) १९३३ पासून

रजि.ऑफिसः १५२, पोलन पेठ, दाणा बाजार, जळगांव. फोन २२२७७११ ते १६. www.jpcbank.com | jaljpcb@jpcbank.com

91 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना : फक्त सभासदांसाठी

आपल्या बँकेची 91 वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार 29 जून 2025 रोजी सकाळी ठीक 8.30 वाजता बँकेचे चेअरमन श्री.अनिकेत भालचंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव पाटील मुक्तांगण, सरस्वती नगर, जळगांव येथे होणार आहे. तरी आपण सभेस उपस्थित रहावे ही विनंती. या सभेत खालील विषयांवर निर्णय घेण्यात येतील –

– सभेपुढील विषय –

1. दि. 30 जून 2024 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. मा.संचालक मंडळाचा दि. 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीच्या कामकाजाचा अहवाल सादर करणे व सदर अहवाल मंजूर करून स्विकृत करणे.
3. दि. 31 मार्च 2025 अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करून स्विकृत करणे.
4. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दि. 31 मार्च 2025 अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस मंजूरी देणे.
5. रिझर्व बँकेच्या परवानगीस अधीन राहून सन 2025-26 या वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक मे व्हीपीएच अँड असोसिएटस् एलएलपी, चार्टर्ड अकाऊंटंटस्, मुंबई यांची नियुक्ती करणे व त्यांची फी ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
6. सन 2024-25 या वर्षाचा वैधानिक लेखा परीक्षकांचा अहवाल स्विकृत करणे (परिशिष्ट 'अ').
7. सन 2024-25 या वर्षाचा वैधानिक लेखा परीक्षणाच्या अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवाल मंजूर करुन स्विकृत करणे.
8. बँकेच्या सन 2025-26 या वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे (परिशिष्ट 'ब').
9. बँकेच्या विविध फंडातून वापरलेल्या रकमेचा आढावा घेणे.
10. बँकेचे संचालक मंडळ, प्रबंध संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे जे कर्मचारी नातेवाईक आहेत, त्यात 2024-25 मध्ये काही बदल झाला असल्यास त्याची नोंद घेणे.
11. रिझर्व बँकेच्या परिपत्रकानुसार, बँकेने 2023-24 या आर्थिक वर्षात नफा विनीयोग खात्यामधून बुडीत व संशयीत कर्जनिधीसाठी केलेल्या तरतूदीची रक्कम, वैधानिक राखीव निधीतून कमी करणेस मान्यता देणे.
12. रिझर्व बँकेच्या परिपत्रकानुसार, डिव्हिडंड इक्वीलायझेशन फंड मध्ये शिल्लक असलेली रक्कम वैधानिक राखीव निधीला जमा करणेस मान्यता देणे.
13. बँकेच्या नावात प्रस्तावित बदल करणेस परवानगी देणे व रिझर्व बँकेच्या परवानगीसाठी सदर प्रस्ताव परत सादर करणे.
14. मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे (परिशिष्ट 'क').
15. या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
16. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : जळगाव (महाराष्ट्र) — **संचालक मंडळाच्या आदेशावरून**
दिनांक : 05.06.2025 — **रोहित पां. भुजबळ - प्रबंध संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी**

– सुचना –

1. गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी सकाळी 9.00 वाजता घेण्यात येईल व त्या सभेला गणसंख्या नसली तरी वरील विषयांवर विचार होऊन निर्णय घेण्यात येईल.
2. वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयांबाबत सभासदांना काही प्रश्न विचारायचे असतील तर ते लेखी स्वरुपात बँकेच्या मुख्य कार्यालयात दि. 23 जून 2025 पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी 11 ते दुपारी 4 या वेळेत आणून द्यावेत.
3. सभासदांनी त्यांचे इ-मेल आयडी व मोबाईल नंबर बँकेस कळवावे म्हणजे मेल व एसएमएस पाठवता येतील. तसेच पत्त्यात बदल असल्यास बँकेस कळवावे.
4. सभासदांनी आपल्या वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या नजीकच्या शाखेतून/ कार्यालयातून विनंती पत्र देऊन घेऊन जावी. वार्षिक अहवाल बँकेचे संकेतस्थळ www.jpcbank.com येथे उपलब्ध आहे. तसेच ज्यांचे इमेल आयडी बँकेत उपलब्ध आहेत अशा सभासदांना अहवाल इमेल ने पाठविलेला आहे.
5. बँकेचे 31 मार्च 2025 अखेरचे नफातोटापत्रक व ताळेबंद तसेच रिझर्व बँकेच्या परिपत्रकानुसार आवश्यक माहिती बँकेचे मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्डवर लावलेली आहे.
6. सभेस येतांना ओळखपत्र आणावे.
7. रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सभासदांनी केवायसी संबंधीत कागदपत्रे जवळच्या शाखेकडे दाखल करावीत.

अल्टम क्रेडो होम फायनान्स प्रा. लि.

Altum Credo Home Finance

नोंदणीकृत कार्यालय: मजला क्र. ७, कल्पतरू इन्फिनिया, वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे ४११००५, महाराष्ट्र (भारत)

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९(१) च्या तरतूदींसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव सूचना. सर्व जनतेला आणि विशेषतः कर्जदार (रां) आणि हमीदार (रां) यांना देण्यात येत आहे की खाली वर्णन करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता **अल्टम क्रेडो होम फायनान्स प्रा. लि.** यानंतर **एसीएचएफएल** असा उल्लेख असलेला यांच्याकडे गहाण ठेवण्यात आल्या होत्या ज्याचा ताबा एसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला असून खाली नमूद कर्जदार (रां) आणि हमीदार (रां) कडून एसीएचएफएल यांना देय असलेल्या खाली नमूद करण्यात आलेल्या रकमेचा आणि त्यावरील व्याज आणि शुल्कासह वसुलीसाठी **"जे आहे जेथे आहे", "जे आहे जसे आहे"** आणि **"जसे आहे तेथे आहे"** तत्त्वावर **२७ जून, २०२५ (शुक्रवार)** रोजी **स. ११.३० वा. दु. ४.३० वा.** दरम्यान करण्यात येणार आहे.

कर्जदार (रां)/ सह-कर्जदारा (रां) आणि हमीदारा (रां) चे नाव/ लोन ए/सी क्र.	वसुली करायची थकित देणी (सुरक्षित कर्ज)	राखीव मूल्य	जमा करण्याची इसारा रक्कम	निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ
(१) श्री. रविन्द्र शेनपाडू पाटील (२) सुनंदा रविन्द्र पाटील कर्ज खाते क्र.: १३७२०४३२६०००३५	रु.५,९६,५७७/- एनपीए दिनांक: ३१.०८.२०२३ ताबा दिनांक १८-फेब्रु.-२०२५	रु.३,२०,०००/- राखीव मूल्य ज्याच्या खाली स्थावर मालमत्तेची विक्री केली जाणार नाही.	रु.३२,०००/-	२७ जून, २०२५ स. ११.३० वा.पासून सायं. ४.३० वा.पर्यंत

सुरक्षित मत्तेचे वर्णन: ए/ पी बाणगाव, ता. चाळीसगाव, जिल्हा जळगाव येथे वसलेल्या ८२.३१ चौ.मी क्षेत्रफळाच्या उत्तर बाजूपैकी १७३.८५ चौ.मी. मोजमाप असलेला मालमत्तेचा धारण केलेला गट क्र. १६१/बी प्लॉट क्र. २० पैकी (उत्तर बाजू) चा सर्व खंड आणि भूखंड आणि ज्याच्या **सीमा पुढील प्रमाणे: पूर्वेस किंवा त्या दिशेने:** ९ मीटर रोड, **पश्चिमेस किंवा त्या दिशेने:** प्लॉट क्र. २२, **दक्षिणेस किंवा त्या दिशेने:** प्लॉट क्र. २० चा शिल्लक भाग **उत्तरेस किंवा त्या दिशेने:** लागून असलेला गट क्र. १६१/ ए.

अटी आणि शर्ती:

(१) मालमत्तेची पाहणी: २० जून २०२५ रोजी १२.३० वा.पासून ४.३० वा.पर्यंत. (२) इसारा रक्कम ठेव यानंतर इरठे म्हणून समजले जाणारे जमा करण्यासाठी शेवटचा दिनांक: २७ जून, २०२५ रोजी सकाळी ११.३० वा. पूर्वी (३) तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया https://altumcredo.co.in/SARFESI ला भेट द्या. (४) प्राधिकृत अधिकारी: स्वप्नील त्रिमांदे: ९५०३३६३९६४

दिनांक: १२.०६.२०२५ — **सही/- प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण: जळगाव — **अल्टम क्रेडो होम फायनान्स प्रा. लि. (एसीएचएफएल)**

रेप्को होम फायनांस लिमिटेड

Repco Home Finance

नाशिक शाखा : दुकान क्र. ६, ७ आणि ८, पहिला मजला, महादेव टॉवर्स, एस.बी.आय. हेड ऑफिसजवळ, सीबीएस, नाशिक - ४२२००१

ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत रेप्को होम फायनांस लिमिटेडकडे गहाण असलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री

ज्याअर्थी **कर्जदार: श्री. राजू मोहम्मद अत्तर,** एस/ ओ श्री. मोहम्मद हुसेन अत्तर, **सह-कर्जदार : श्री. हाजी युनुस मोहम्मद अत्तर (मयत)** एस/ ओ श्री. मोहम्मद हुसेन अत्तर, **२. श्रीमती परवीन युनुस अत्तर (सह-कर्जदार** १ ची कायदेशीर वारस १), डब्ल्यू/ ओ मयत हाजी युनुस मोहम्मद अत्तर **३. श्री. सलमान युनुस अत्तर (सह-कर्जदार** १ ची कायदेशीर वारस २) एस/ ओ मयत हाजी युनुस मोहम्मद अत्तर, **४. श्रीमती शबाना राजू अत्तर,** डब्ल्यू/ओ श्री. राजू मोहम्मद अत्तर, **हमीदार : श्री. असिफ हरून अत्तर,** एस/ओ श्री. हरून कासम अत्तर यांनी **रेप्को होम फायनान्स लिमिटेड, नाशिक शाखा** यांच्याकडून खाली तपशिलामध्ये सविस्तरपणे वर्णन करण्यात आलेली स्थावर मालमत्ता गहाण ठेऊन कर्जाऊ पैसे घेतले आहेत. कर्जदार/ रां ना रकमेचा भरणा करता आला नसल्यामुळे कंपनीने सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्ज खाते क्र. **१६३१८७००००९३३** मधील **२७.०३.२०२३ अनुसार रु. २२,९४,७०६/-** अधिक त्यावरील व्याज, शुल्क आणि खर्चाचा भरणा करण्यासाठी नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी २०.०८.२०२० रोजी जारी करण्यात आली होती.

ज्याअर्थी कर्जदार आणि सह-कर्जदार यांना कंपनीने पाठविण्यात आलेल्या मागणी सुचनेमधील रकमेचा भरणा करता आलेला नसल्यामुळे कंपनीने कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथील खालील परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा **२३.०८.२०२३** रोजी ताबा घेतला होता.

ज्याअर्थी कर्जदार पूर्ण रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सुरक्षित धनको **रेप्को होम फायनांस लिमिटेड** ने सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (४) अंतर्गत खाली नमूद मालमत्तेची कंपनीच्या थकीत देण्याची वसुली करण्यासाठी **'जे आहे जेथे आहे तत्त्वावर'** आणि 'जे आहे जसे आहे तत्त्वावर' विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्जदाराची कर्ज खाते क्र. **१६३१८७००००९३३ मधील २९.०५.२०२५ अनुसार रु. ३०,४५,०३१/- ची देणी आहेत.**

ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ : १५.०७.२०२५, रोजी स. ११.०० वा. - दु. १२.०० वा. (५ मिनिटांच्या अमर्यादित ऑटो विस्तारासह)

ई-निविदा सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ : १४.०७.२०२५ रोजी सायं. ४.०० वा.

मालमत्तेचे वर्णन: गाव मनमाड, ता. नांदगाव, जिल्हा नाशिक येथे वसलेल्या सर्वे क्र. ९/१ए/३ वरील भाग्यश्री कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. मधील २०४ चौ. मी. मोजमापाच्या प्लॉटवर बांधण्यात आलेल्या ६७.१८ चौ. मी. मोजमाप असलेल्या बंगल्याचा सर्व खंड आणि भूखंड. आणि सीमा पुढील प्रमाणे : पूर्वेस किंवा त्या दिशेने : प्लॉट क्र. ८९, पश्चिमेस किंवा त्या दिशेने: प्लॉट क्र. ७५, दक्षिणेस किंवा त्या दिशेने: प्लॉट क्र. ८१, उत्तरेस किंवा त्या दिशेने : ६ मी. कॉलनी रोड.

राखीव किंमत रु. ३०,६१,०००/- | **इरठे :** (राखीव मूल्याच्या १०%) रु. ३,०६,१००/- | **किमान बोली वाढ रक्कम** रु. २५,०००/-

ई-लिलाव प्रक्रियेसाठी कृपया मे. ४क्लोझर, **श्री. दिनेश - ८१४२०००७३५, ८१४२०००६१९.** मालमत्तेच्या पाहणीसाठी इच्छुक बोलीदार शाखा प्रमुख, **रेप्को होम फायनांस लिमिटेड, नाशिक शाखा,** यांच्याशी कामकाजाच्या सर्व दिवसांमध्ये **स. १०.०० ते सायं. ५.०० वा. दरम्यान करता येईल. संपर्क क्र: ०२५३ २५०९७६९ आणि ९५९५४ ४६६५५.**

दिनांक: ३१.०५.२०२५ — **प्राधिकृत अधिकारी, रेप्को होम फायनांस लिमिटेड.**

पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए – ई-लिलाव – स्थावर मालमत्तेची जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंत्रिक्श भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

शाखा कार्यालय : ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लँडमार्क, तनिश्क शोरुमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शहारणपूर रोड, नाशिक-४२२००२, महाराष्ट्र.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. "ए" मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या / ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. "डी" मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. "सी"मध्ये वर्णिल्यानुसार) **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशिलानुसार **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

ऋणको / गहाणकार / विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. "ए" मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको / गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/सुरक्षित धनकोच्या** www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं./ऋणको/सह-ऋणको/ हमीदार/विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचा प्रकार (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहाणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार / न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
HOU/NSK/1116/331230 & HOU/NSK/1116/332145 सुनिल प्रमोद भावसार/पल्लवी कमलाकर जोगी/शाखा कार्यालय : नाशिक	रु. १९८००८६.६५ व ३१.०३.२०२१ रोजीप्रमाणे	प्रत्यक्ष ताबा	रेसिडेन्शियल सिंगल बिल्डिंग, ७,७०३, "गजानन दर्शन", प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ३२३/१/१/बी, अतुल स्वीट्सजवळ, पाथार्डी फाटा, पाथार्डी, नाशिक-४२२००१, महाराष्ट्र, भारत. (बिल्ट-अप एरिआ ६५९)	रु. १४२२०००/-	रु. १४२२००/-	२६.०६.२०२५	रु. १०,०००/-	२३.०६.२०२५ रोजी दु. १२.०० व दु. ०४.०० दरम्यान	२७.०६.२०२५ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान	ज्ञात नाही

*** त्याकरिता वसुली आणि / किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित. ** "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. "के" मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर / सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार / दावे नाहीत. याअधिक, सदर भार यशस्वी खरीददार/ बोलीदाराद्वारा, त्याच्या / तिच्याकडील, सोसावयाचे आहेत / प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्ररीत्या पडताळणी करून निश्चित करावेत.** (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता / सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि / किंवा वासलात लावणे यापासून "पीएनबीएचएफएल"ला / "पीएनबीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि / किंवा निषेधाज्ञा आलेली नाही आणि सद्य स्थिती रकाना नं. "के" मध्ये नमूद केलेली आहे. (२.) भावी खरीददार / बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. "के" मध्ये नमूद केलेल्या व मंजूर केलेल्या प्रक्रिया / आदेश, इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता "पीएनबीएचएफएल"कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादेत नाहीत आणि निविदा / बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. (३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार / खरीददाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्रि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किंमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्रि निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता / सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्टच्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल. (४.) **मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रिच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले - प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट - www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहाणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता तुम्हास विवेक लोधा, टोल-फ्रि नं. : १८०० १२० ८८०० व ई-मेल : auction@pnbhousing.com,** जी "पीएनबीएचएफएल"ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा **www.pnbhousing.com** या वेबसाइटला भेट द्यावी.

स्थळ : नाशिक **दिनांक :** १२.०६.२०२५ — स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

डीसीबी बँक लिमिटेड,

३०२, सेलो प्लॅटिना, एफ. सी. रोड, शिवाजीनगर, पुणे-४११००५

DCB BANK

मागणी सूचना
सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत

तुम्ही, खाली नमूद केलेले कर्जदार, सह-कर्जदार, तुमच्या स्थावर मालमत्ता (सिक्युरिटीज) गहाण ठेवून डीसीबी बँक लिमिटेडकडून कर्ज सुविधा घेतली आहे. तुमच्या थकबाकीमुळे, तुमच्या कर्जाचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकरण केले गेले. डीसीबी बँक लिमिटेड यांनी थकबाकी वसूल करण्यासाठी, सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (कायदा) च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी केली आहे. ज्याचा मजकूर येथे तुम्हाला सेवेसाठी म्हणून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३(१) सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम १३(२) यानुसार येथे प्रकाशित केली जात आहे. कर्जदार, सह-कर्जदार, गहाण ठेवलेल्या मालमत्ता, थकबाकी, कलम १३(२) अंतर्गत पाठवलेल्या मागणी सूचना आणि त्याअंतर्गत दावा केलेल्या रकमेचे तपशील खालीलप्रमाणे दिले आहेत:

अ. क्र.	कर्जदार, सह-कर्जदार/जामीनदार यांचे नाव आणि पत्ता, कर्ज खाते क्रमांक, कर्जाची रक्कम	सुरक्षित मालमत्तेचा पत्ता	१) मागणी सूचना तारीख २) थकित थकबाकी ३) एनपीए तारीख
१	**१. श्री. प्रसाद किशोर चव्हाण, २. श्री किशोर सीताराम चव्हाण, ३. श्रीमती ललिता किशोर चव्हाण.** **सर्व राहणार पत्ता** - सदनिका क्र. एन-३१/ए-२/०६/१३, तळ + पहिला मजला ३ योजना, एनएच आषाढ सेक्टर ए-२, सप्तशृंगी चौक, बाविस्कर ज्वेलर्सजवळ, दत्त चौक सिडको नाशिक- ४२२०१० येथे. **कर्ज खाते क्रमांक-** DRBLNAS00582157 **मंजूर कर्ज रक्कम :** रु. ७,१०,०००/-	मालमत्ता धारण सदनिका क्र. एन-३१/अ-२/०६/१३, मोजमापे प्लॉट क्षेत्रफळ ३० चौ.मी. आणि तिसऱ्या योजनेत त्याचे बांधलेले क्षेत्रफळ १२.९३ चौ.मी., शेजारच्या आषाढ सेक्टर ए-२ येथे, सिडको नवीन नाशिक तालुका आणि जिल्हा नाशिक येथे याचे ते सर्व तुकडे आणि पार्सल (सुरक्षित मालमत्ता)	१) २२-०५-२०२५ २) रु. ७,३९,१९०/- (रुपये सात लाख एकोणचाळीस हजार एकशे नव्वद फक्त) दि. २२ मे २०२५ रोजीनुसार ३) एनपीए तारीख - ०४.०४.२०२५
२	**१. श्री माणिक रमेश नेहे, २. श्रीमती संगिता माणिक नेहे.** **सर्व राहणार पत्ता** - अ. क्र. ९६१/१/२अ, प्लॉट क्र. ४१ रो हाऊस-१ सप्तशृंगी नगर, उद्योग भवनजवळ, सिन्नर नाशिक- ४२२१०३, **कर्ज खाते क्रमांक-** DRHLNAS00613671 **मंजूर कर्ज रक्कम :** रु. २०,८०,०००/-	रो हाऊस क्र. ०३ असलेली मालमत्ता, 'साई गॅलेक्सी एक्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात मोजमापे ४२.१२ चौरस मीटर क्षेत्रफळ आणि ६६१.४८ चौरस फूट बांधलेले क्षेत्रफळ म्हणजेच मोजमापे ६१.४७ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेले, भूखंड क्र. ९० वर बांधलेले, मोजमापे १५० चौरस मीटर क्षेत्रफळ असलेले, सर्वेक्षण क्र. ९६१/१/९६१/२अ/ ९६१/२ब यापैकी, मौजे सिन्नर ता. सिन्नर आणि जिल्हा नाशिक येथे स्थितचे सर्व तुकडे आणि पार्सल, द्वारे सीमाबद्ध : पूर्व - सर्व्हे क्र.; लगत, पश्चिम - ९ मीटर रुंद कॉलनी रोड, दक्षिण - प्लॉट क्र. ८९, उत्तर - रो हाऊस क्र. २ (सुरक्षित मालमत्ता).	१) २०-०५-२०२५ २) रु. २१,३६,४२८/- (रुपये एकवीस लाख छत्तीस हजार चारशे अठ्ठावीस फक्त) दि. २० मे २०२५ रोजीनुसार ३) एनपीए तारीख - ०४.०५.२०२५
३	**१. श्री. नरेंद्र सुनील खैरनार, २. श्री. सुनील डागा खैरनार, ३. श्री. निलेश सुनील खैरनार, ४. श्रीमती कल्पना सुनील खैरनार.** **सर्व राहणार पत्ता :** उत्तरेकडील रो हाऊस, प्लॉट क्र. १३३ चा भाग, जमीन पहिला मजला अ क्र. ५१/२ जिल्हाधिकारी कार्यालयाच्यामागे, महाकालेश्वर महादेव मंदिराजवळ, शिव रस्ता सोयगाव शिवार ता. मालेगाव जिल्हा नाशिक- ४२३२०३ **कर्ज खाते क्रमांक-** DBLALAL00608729 **मंजूर कर्ज रक्कम :** रु. ९,८०,०००/-	मालमत्ता धारण सर्वेक्षण क्र.५१/२ प्लॉट क्र. १३३ पैकी, क्षेत्रफळ मोजमापे ११२१.८८ चौ.मी., उत्तर भाग क्षेत्रफळाबाहेर ४०.६३ चौ.मी. बांधलेले रो हाऊस युनिट क्र. आर.सी. तळमजला क्षेत्रफळ २६.३३ चौ.मी. + पहिला मजला क्षेत्रफळ १५.२९ चौ.मी. एकूण बांधलेले क्षेत्रफळ ४१.६२ चौ.मी. आणि उर्वरित रिक्त जागा सोयगाव, ता. मालेगाव जिल्हा नाशिक येथे स्थितचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, द्वारे सीमाबद्ध - पूर्व-रस्ता, पश्चिम-सर्वेक्षण क्र. ५३ लगत, दक्षिण- प्लॉट क्र. १३३ पैकी युनिट क्रमांक ब, उत्तर-युनिट क्र. अ प्लॉट क्र. १३२ पैकी. (सुरक्षित मालमत्ता)	१) २४.०५.२०२५ २) रु. १०,७१,६४०/- (रुपये दहा लाख एकाहत्तर हजार सहाशे चाळीस फक्त) दि. २४ मे २०२५ रोजीनुसार ३) एनपीए तारीख - ०४.०४.२०२५

म्हणून, तुम्ही कर्जदार आणि सह-कर्जदार/ जामीनदार, या सूचनेपासून ६० दिवसांच्या आत वर नमूद केलेल्या मागणी केलेल्या रकमेचे पूर्ण व्याजासह पूर्ण पैसे द्यावेत, असे सांगण्यात येत आहे, अन्यथा खालील स्वाक्षरीदारांना वर नमूद केलेल्या सिक्युरिटीजची अंमलबजावणी करण्यासाठी कायद्याअंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल. **निर्देशित कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधण्यात आले आहे, ज्याच्या आधारे तुम्ही वरील तरतुदीमध्ये नमूद केलेल्या कालावधीत सुरक्षित मालमत्तेची** पूर्तता करण्यास स्वतंत्र आहात. कृपया लक्षात ठेवा की, सदर निर्देशित कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, तुम्हाला आमच्या संमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे वर उल्लेखित सिक्युरिटीज हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

ठिकाण: नाशिक. **दिनांक: १२.०६.२०२५** — **"सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक स्पष्टतेसाठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध केलेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल"** — **सही/-अधिकृत अधिकारी, डीसीबी बँक लिमिटेड,**